## MAHARASHTRA ACT No. X OF 1963.

## THE CENTRAL PROVINCES AND BERAR REGULATION OF COUCHING (MAHARASHTRA EXTENSION AND AMENDMENT) ACT, 1962.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमति दिनांक ३० जानेवारी १९६३ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो याद्वारें सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

बी. पी. दलाल,
महाराष्ट्र शासनाचे सचिव,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. X OF 1963.

### AN ACT TO EXTEND THE CENTRAL PROVINCES AND BERAR REGULATION OF COUCHING ACT, 1944, TO THE REST OF THE STATE OF MAHARASHTRA, AND FOR THAT AND CERTAIN OTHER PURPOSES FURTHER TO AMEND THE SAID ACT.

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर, "महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रांत" दिनांक ७ फेब्रुवारी १९६३ रोजीं प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

**मध्यप्रांत व वऱ्हाडचा डोळयांतील मोतीबिंदु काढण्याचें नियमन करण्याबाबत अधिनियम, १९४४, हा महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें आणि त्या व इतर विवक्षित कारणांसाठीं उक्त अधिनियमांत आणखी सुधारणा करणें याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मध्यप्रांत व वऱ्हाडचा डोळयांतील मोतीबिंदु काढण्याचें नियमन करण्याबाबत अधिनियम, १९४४, हा महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें आणि त्या व यांत पुढें दिलेल्या इतर विवक्षित कारणांसाठीं उक्त अधिनियमांत आणखी सुधारणा करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी याद्वारें पुढील प्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. ह्या अधिनियमास मध्यप्रांत व वऱ्हाडचा डोळयांतील मोतीबिंदु काढण्याचें नियमन करण्याबाबत (महाराष्ट्र व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६२ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागांत अंमलांत असलेला मध्यप्रांत व वऱ्हाडचा डोळयांतील मोतीबिंदु काढण्याचें नियमन करण्याबाबत अधिनियम, १९४४ हा याद्वारें त्या सबंध राज्यास लागू करण्यांत येत असून तो त्या राज्यांत अंमलांत असेल. सन १९४४चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ हा महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागास लागू करणें.

सन १९४४चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या प्रस्तावनेची सुधारणा.

३. महाराष्ट्र राज्यास लागू केलेला मध्यप्रांत व वऱ्हाडचा डोळ्यांतील मोतीबिंदु काढण्याचें नियमन करण्याबाबत अधिनियम, १९४४ (ज्याचा यांत पुढें "मुख्य अधिनियम" असा उल्लेख केला आहे) याच्या प्रस्तावनेतील "आणि ज्याअर्थी" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "अधिनियम करण्यांत येत आहे" या शब्दांनीं संपणाऱ्या मजकूराऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—

"त्याअर्थी, याद्वारें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे" :—

सन १९४४चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाचें कलम १ यांत,—

(अ) पोट-कलम (२) मध्यें, "विदर्भ विभागास" ह्या शब्दांऐवजीं "महाराष्ट्र राज्यास" हे शब्द दाखल करावे ;

(ब) समास टीपेंतील "लघु संज्ञा" ह्या शब्दांनंतर "आणि व्याप्ति" हे शब्द दाखल करावे.

सन १९४४चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्यें, "या संज्ञेचा अर्थ" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "तोच असेल" या शब्दांनीं संपणाऱ्या मजकूराऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—

"या संज्ञेचा अर्थ,—

(अ) मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ ;

(ब) मध्यप्रांत व वऱ्हाड वैद्यक नोंदणी अधिनियम, १९१६ ;

(क) वैद्यक नोंदणी अधिनियम (सन १३४८ फसली);

(ड) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ ; किंवा

(इ) व्यवसायींची नोंदणी व त्यांचा व्यवसाय यांचें नियमन करणारा त्या त्या वेळीं राज्यांत अंमलांत असलेला इतर कोणताहि विधि या अन्वयें नोंदलेला व या अधिनियमाच्या कारणाकरितां राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें राज्य सरकार शल्यचिकित्सेचा व्यवसाय करण्यासाठीं ज्या पात्रतांस मान्यता देईल अशा पात्रता धारण करणारा इसम, असा समजावा.".

सन १९४४ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाचें कलम ३ यांत, "नोंदलेला व्यवसायी नसलेला" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या व "व्यावसायिक पात्रता धारण न करणारा जो कोणताहि इसम" ह्या शब्दांनीं संपणाऱ्या मजकुराऐवजीं पुढील मजकूर दाखल करावा :—

"कोणत्याहि इतर विधींत कांहींहि असलें तरीहि, नोंदलेला व्यवसायी नसलेला किंवा नोंदलला व्यवसायी म्हणून त्यास हक्क प्राप्त करून देणाऱ्या पात्रता धारण न करणारा जो कोणताहि इसम;".

सन १९४४ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ६ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाचें कलम ६, पोट-कलम (१) मध्यें—

"दुसऱ्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशाच्या" ह्या मजकुराऐवजीं "प्रेसिडेन्सी फौजदारी न्यायाधीशाच्या किंवा पहिल्या वर्गाच्या फौजदारी न्यायाधीशाच्या" हा मजकूर दाखल करावा.

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.